सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :२२५२/अनुम/उ.ता./२०२०/१६** **दिनांक :-** १५ डिसेंबर, २०२२

## - घोषणा -

**विषय :- "अनुवादक (मराठी), भाषा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट-क चाळणी परीक्षा - २०२२" (जाहिरात क्रमांक १६/२०२०)** या ऑनलाईन चाळणी परीक्षेच्या प्रथम उत्तरतालिकेवरील हरकती सादर करण्याबाबत.

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत **दिनांक ०१ डिसेंबर, २०२२** रोजी आयोजित "**अनुवादक (मराठी), भाषा संचालनालय, सामान्य राज्य सेवा, गट-क चाळणी परीक्षा - २०२२**" या ऑनलाईन चाळणी परीक्षेच्या वस्तुनिष्ठ स्वरुपाच्या प्रश्नपुस्तिकेची उत्तरतालिका ही संगणक प्रणालीआधारे निर्धारीत केलेल्या Question ID नुसार योग्य उत्तराचा पर्याय नमूद करुन प्रथम उत्तरतालिका आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. उमेदवारांनी त्यांच्या Profile मध्ये प्राप्त झालेल्या प्रश्नपत्रिकेतील Question ID नुसार उत्तरतालिका तपासणे आवश्यक राहील.

२. प्रस्तुत परीक्षेसाठी उपस्थित उमेदवारांना उत्तरतालिकेवर हरकती सादर करावयाच्या असल्यास, आयोगाच्या संकेतस्थळावरील दिनांक १७ नोव्हेंबर, २०२१ व १ जुलै, २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकामध्ये नमूद कार्यपध्दतीनुसार केवळ ऑनलाईन पध्दतीने व विहित शुल्काचा भरणा करुन हरकती सादर करणे आवश्यक आहे.

३. विहित ऑनलाईन पध्दती व्यतिरिक्त अन्य कोणत्याही नमुन्यातील अथवा अन्य कोणत्याही मार्गाने/ पध्दतीने सादर करण्यात आलेल्या हरकती तसेच विहित शुल्काचा भरणा न केलेल्या हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

४. उत्तरतालिकेबाबत हरकती सादर करण्याची सुविधा **दिनांक २० डिसेंबर, २०२२** रोजी **२३.५९** वाजेपर्यंत सुरु राहील.

५. ऑनलाईन पध्दतीने सादर करण्यात कोणत्याही तांत्रिक अडचणी उद्भवल्यास आयोगाच्या सुविधा केंद्राच्या १८००-१२३४-२७५ व ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर तसेच support-online@mpsc.gov.in या ईमेलवरुन विहित कालावधीत आवश्यक मदत प्राप्त करुन घेता येईल.

परीक्षा नियंत्रक व सहसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई

ठिकाण : मुंबई